# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

**अत्यंत महत्वाचे**

क्रमांक संगाबाअवि/३/संपमूम/६८/२०२२
दिनांक : ११ फेब्रुवारी, २०२२

प्रति,

प्राचार्य / विभागप्रमुख / मानद संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील पदवी व पदव्यूत्तर शैक्षणिक विभाग
मॉडेल डिग्री कॉलेज, बुलढाणा.

**विषय : उन्हाळी-२०२२ विद्यापीठीय परीक्षा प्रचलित पद्धतीने संचालनाबाबत.**
संदर्भ : क्रमांक संगाबाअवि/३/संपमूम/६५/२०२२, दिनांक : ११ फेब्रुवारी, २०२२

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भांकित विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, कोविड-१९ ची सद्यःस्थिती विचारात घेऊन उन्हाळी-२०२२ मध्ये होणाऱ्या विद्यापीठाच्या लेखी, प्रात्यक्षिक, प्रकल्प परीक्षा इत्यादी (उन्हाळी-२०२० परीक्षेपूर्वी ज्या पद्धतीने संचालित करण्यात येत होत्या) प्रचलित पद्धतीने संचालित होणे अपेक्षित असल्यामुळे अभ्यासक्रमिकेनुसार प्रचलित पद्धतीने सर्व बाबी पूर्ण कराव्यात. तसेच उन्हाळी-२०२० परीक्षेपूर्वी जी महाविद्यालये परीक्षा केंद्र होती, त्या महाविद्यालयांनी उन्हाळी-२०२२ परीक्षेकरीता परीक्षा केंद्र उपलब्धतेबाबत नियोजन करावे. तसेच उपरोक्त बाबींची सूचना आपल्या स्तरावर अधिनस्त सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना तसेच सर्व संबंधित विद्यार्थ्यांना अवगत करुन द्यावी, ही विनंती.

तसेच उन्हाळी-२०२० परीक्षेपासून कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे व त्यानुसार झालेल्या टाळेबंदीमुळे निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेता, विद्यार्थ्यांकडून परीक्षा आवेदनपत्रे स्वीकारतांना कोणत्याही प्रकारचे विलंब शुल्क आकारण्यात आले नाही. परंतु उन्हाळी-२०२२ पासून विद्यापीठाच्या उपरोक्त सर्व परीक्षा (उन्हाळी-२०२० परीक्षेपूर्वी ज्या पद्धतीने संचालित करण्यात येत होत्या) प्रचलित पद्धतीने संचालित होणे अपेक्षित असल्यामुळे विद्यापीठाने विहित केलेल्या नियमानुसार परीक्षा शुल्क व विलंब शुल्क स्वीकारूनच परीक्षा आवेदनपत्रे ऑनलाईन / ऑफलाईन प्रणालीनुसार स्वीकारण्यात यावी. निदेश क्रमंक २३/२०१५, दिनांक १९/११/२०१५ नुसार कार्यवाही करण्यात यावी, उपरोक्त बाबींची सूचना आपल्या स्तरावर अधिनस्त सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना तसेच सर्व संबंधित विद्यार्थ्यांना अवगत करुन द्यावी, ही विनंती.

आपला,

(डॉ.हेमंत आर.देशमुख)
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

प्रतिलीपी :

१) वित्त व लेखा अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
२) जनसंपर्क अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
३) उपकुलसचिव (परीक्षा/चौकशी), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
४) उपकुलसचिव (आचार्य कक्ष) संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
५) सहाय्यक कुलसचिव (गोपनीय), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
६) सहाय्यक कुलसचिव (सारणी), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
७) सहाय्यक कुलसचिव (नामांकन), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
८) सहाय्यक कुलसचिव (परीक्षा), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

प्रत माहितीस्तव :

१) मा.कुलगुरु, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
२) मा.कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

234Narwade Sir